




दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : ३१७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२८ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056



# अमित शाह यांच्याकडून 'ऑपरेशन देवेंद्र' सुरु, उद्धव ठाकरेंचं मोठं भाकीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, हिंगोली :** फुटलेले खासदार भाजपात जाण्याऐवजी एकनाथ शिंदेंच्या पक्षात का गेले? हे मोठं कोडं आहे. भाजपात का नाही गेले? मला तर आता शंका वाटते? काल योगायोगाने मुख्यमंत्री आणि मी एकाच विमानाने प्रवास केला. त्यावर पत्रकारांनी विचारलं चर्चा काय होती? मी म्हटलं, उच्च स्तरीय चर्चा होती, ढगांच्या वरची चर्चा होती. पण हे ऑपरेशन टायगर नाही तर ऑपरेशन देवेंद्र आहे, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. ते हिंगोलीत बोलत होते.

**उद्धव ठाकरेंचा मोठा दावा**

मला शंका वाटतेय, हे जे म्हणत आहेत ना, ऑपरेशन टायगर, अरे टायगरवर कुणी ऑपरेशन करु शकत नाही. एक पंजा मारला ना तर तुमचे सगळे आतील बाहेर येतील. हे ऑपरेशन टायगर नाही, मला शंका आहे की, हे ऑपरेशन देवेंद्र आहे. कारण त्यांना असं वाटतंय की, उद्या देवेंद्र फडणवीस पंतप्रधान पदाच्या शर्यतीत उतरतील. म्हणून आताच त्यांचे पंख काप, महाराष्ट्रातून एकही माणूस दिल्लीपर्यंत पोहचता कामा नये म्हणून त्याला तिथल्या तिथे गुंतवून





ठेवावे यासाठी शिवसेनेचे खासदार फोडून अमित शाह यांनी त्यांना शिंदेंकडे पाठवले आहे. हा माझा स्पष्ट आरोप नाही तर ही माझी समज आहे, असा मोठा दावा उद्धव ठाकरेंनी केला.

**'अमित शाह यांना पंतप्रधान पदासाठी मत मिळावं म्हणून खासदार फोडले'**

आता निवडणूक नाहीय. मग कशासाठी तुम्ही माझे खासदार फोडले? फोडले तरी तुम्ही स्वत:कडे खासदार न ठेवता, तुमच्याकडे असणाऱ्या गुलामाकडे हे खासदार सरकवले आहेत. म्हणजे उद्या वेळ आली की तुम्ही पंतप्रधान पदासाठी कुणाला मत द्याल? तेव्हा हे सगळे गुलाम अमित शाह यांना मतदान करतील. ही पुढची व्यवस्था आहे. म्हणून शिवसेना फोडत आहेत, असं मोठं भाकीत उद्धव ठाकरे यांनी वर्तवलं.

**उद्धव ठाकरेंनी व्यक्त केली खंत**

हे सगळं दोन तृतीयांश बहुमतासाठी चाललं आहे. कारण निवडून आले नाहीत. आपण त्यांना येऊ दिलं नाही, भाजप २४० जागांवर थांबला, मग पुढे काय करायचं? घटना तर बदलायची आहे. आता तर पूर्ण ताकद पाहिजे. मध्ये महिला आरक्षणाच्या बुर्ख्या आडून डिलिमिटेशनचे जे बिल आणत होते ते जर झाले तर तुम्हाला आम्हाला कुणी विचारणार नाही. उत्तरेच्या ताब्यात हा देश जाईल. आमच्या मताला काहीच किंमत नाही, अशी खंत उद्धव ठाकरेंनी व्यक्त केली.

## राज्यातील ८४ हजार आशा सेविकांसह, इतरही कर्मचाऱ्यांना मिळणार शासकीय विमा योजनेचा लाभ

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, मुंबई :** राज्यातील आशा स्वयंसेविका व एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांना राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेत आणण्यासाठी आरोग्य विभागाकडून लवकरच महत्वपूर्ण निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. या कर्मचाऱ्यांना योजनेचा लाभ मिळाल्यास त्यांच्यावरील वैद्यकीय खर्चाचा भार कमी होईल. तसेच अपघात, गंभीर आजार आणि मातृत्वाच्या काळात आर्थिक आधार मिळू शकणार आहे.

राज्यात सुमारे ८४ हजार आशा स्वयंसेविका आहेत. कंत्राटी तत्वावर भरलेल्या २१ हजारांहून कमी वेतन असलेल्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनाही या योजनेचा फायदा देण्याचा सरकारचा विचार आहे. त्यांना



राज्य कामगार विमा योजना लागू करण्याबाबत गुरूवारी मुंबईत बैठक झाली. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी ही योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. बैठकीत आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक, आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचारी तसेच पतसंस्था कर्मचारी, रेशन दुकानातील कामगार, खाजगी शाळांचे कर्मचारी, स्वयंरोजगार संस्था, वाचनालयातील कर्मचारी अशा २१ हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या घटकांना राज्य कामगार विमा योजनेचा लाभ देण्याच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

दरम्यान या प्रस्तावामुळे राज्यातील हजारो कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सुरक्षिततेचा लाभ मिळणार आहे. राज्यात सुमारे ८४ हजार आशा सेविका कार्यरत असून, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे पाहोचवत आहेत. ही योजना लागू झाल्यास त्यांच्यासह अन्य घटकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे आबिटकर यांनी सांगितले.

## मित्रनगर परिसरात इसमाची हत्या
## रामनगर पोलिसांनी काही तासातच आरोपीला केली अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२७, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील मित्रनगर चौकात गुरुवारी मध्यरात्री एका ४८ वर्षीय इसमाची लाथाबुक्क्यांनी मारहाण करून आणि दगडाने वार करीत निघृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण चंद्रपुरात एकच खळबळ उडाली आहे. मात्र, रामनगर पोलिसांनी कमालीची तत्परता दाखवत अवघ्या काही तासांतच आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. संतोष अरुण भेंडे, वय ४८ वर्षे, रा. पाळा जिल्हा अमरावती असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तर अजय उर्फ ॲप्पल शंकर पोहनकर, वय १९ वर्षे, राहणार मित्रनगर, चंद्रपूर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. प्राथमिक माहितीनुसार, हा धक्कादायक प्रकार अनैतिक संबंधाच्या संशयातून घडल्याचे समोर आले आहे. गुरुवारी मध्यरात्री 'डायल ११२' वर मित्रनगर परिसरात भांडण सुरू असल्याची माहिती रामनगर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले, मात्र तोपर्यंत संतोष भेंडे हे रक्ताच्या थारोळ्यात मृत पडले होते.

घटना घडताच उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद चौगुले व रामनगर पोलीस स्टेशनच्या ठाणेदार प्रभावती एकुरके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी रात्रीच बस स्टँड, रेल्वे स्टेशन आणि शहरातील निर्जन स्थळांवर शोधमोहीम राबवली. सुरुवातीला कोणताही सुगावा लागला नाही. मात्र, २६ जूनच्या सकाळी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली. यादरम्यान, संशयित आरोपी अजय पोहनकर हा वडगाव परिसरात लपून बसल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ सापळा रचून त्याला वडगावमधून ताब्यात घेतले.

पोलिसांनी आरोपी 'ॲप्पल' पोहनकर याची कसून चौकशी केली असता, त्याने आपला गुन्हा कबूल केला आहे. मृत संतोष भेंडे हा अजयच्या घरी यायचा आणि घरातील महिलांना त्रास द्यायचा, याच रागातून अजयच्या मनात संतोषबद्दल असंतोष धुमसत होता. गुरुवारी रात्री दोघे मित्रनगर चौकात समोरासमोर आले. तिथे त्यांच्यात जोरदार वाद झाला आणि रागाच्या भरात अजयने संतोषला लाथाबुक्क्यांनी व दगडाने बेदम मारहाण केली. या मारहाणीत संतोष सिमेंटच्या झाकणावर कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. संतोष फक्त बेशुद्ध पडला आहे असे समजून आरोपीने तिथून पळ काढला होता. अनैतिक संबंधाचा संशय आणि घरच्या महिलांना होणाऱ्या त्रासाचा बदला घेण्यासाठी एका १९ वर्षाच्या तरुणाने हे टोकाचे पाऊल उचलले. या प्रकरणाचा पुढील तपास रामनगर पोलीस करत आहेत.

## चंद्रपूर मनपातील सफाई कामगारांच्या वारसांना न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा करणार : खा. प्रतिभा धानोरकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** लाड- पागे समितीच्या शिफारशी व शासन निर्णयानुसार सफाई कुली- सफाई रेजा (सफाई कामगार) यांच्या पात्र वारसांना चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या प्रशासनविरोधात वारसदारांनी दि. २२ जून २०२६ पासून बेमुदत आमरण उपोषण सुरु केले आहे.

या आंदोलनाची गंभीर दखल घेत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दि. २६ जून रोजी मनपा समोरील उपोषण मंडपाला प्रत्यक्ष भेट दिली. त्यांनी आंदोलकांशी चर्चा करुन त्यांच्या तीव्र भावना आणि मागण्या जाणून घेतल्या व हा न्याय्य प्रश्न त्वरीत सोडविण्यासाठी प्रशासनाकडे खंबीर पाठपुरावा करण्याचे ठोस आश्वासन दिले. या संवेदनशील विषयात तातडीने पावले उचलत खा. प्रतिभा धानोरकर यांनी नागपूरचे विभागीय आयुक्त यांना विशेष पत्र पाठवून प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. चंद्रपूर महानगरपालिकेने ५ डिसेंबर २०२४ रोजी पात्र वारसांकडून अर्ज मागवून व झोननिहाय प्रत्यक्ष कामाचा अहवाल स्वीकारुन संपूर्ण प्रक्रिया राबविली होती. परंतू, त्यानंतर अचानक ' १२ ऑगस्ट १९७५ ते २३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत अर्ज प्राप्त झाले नाहीत' असे हास्यास्पद व बेकायदेशीर कारण पुढे करुन वारसांना नोकरी देण्यास नकार दिला. प्रशासनाची ही भूमिका अत्यंत



अन्यायकारक, शासनाचे स्पष्ट आदेश, आणि उच्च न्यायालयाच्या निर्देशांचा अवमान करणारी असल्याचा संताप त्यांनी पत्रात नमूद केला आहे. सफाई कामगारांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेक वर्ष प्रामाणिकपणे जनतेची सेवा केली असून, त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देणे ही प्रशासनाची सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. चंद्रपूर महानगरपालिकेने अतिरिक्त पदांसाठी नगर विकास विभागाकडे पाठविलेल्या दि. २६ मे २०२५ च्या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेऊन सर्व पात्र वारसांना तात्काळ वारस हक्काने नोकरीत सामावून घ्यावे, अशी आग्रही मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे.

गेल्या पाच दिवसापासून सुरु असलेल्या या उपोषणामुळे आंदोलकांच्या आरोग्याला कोणताही गंभीर धोका निर्माण होणार होण्यापूर्वी किंवा कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती उद्भ्वण्यापूर्वी , प्रशासनाने त्यांच्या न्याय्य मागण्या तात्काळ पूर्ण करुन हे आंदोलन सन्मानपूर्वक सोडवावे, असा स्पष्ट इशारा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिला आहे.

## अमळनेरमध्ये मृतदेहांची वाहतूक घंटा गाडीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, जळगाव :** एखाद्या शहराची ओळख केवळ रस्ते, इमारती किंवा विकासकामांवरून होत नाही, तर तेथील प्रशासन जिवंत आणि मृत नागरिकांशी किती सन्मानाने वागते? यावरूनही ठरते. मात्र अमळनेर शहरात गेल्या काही दिवसांत समोर आलेल्या घटनांनी नगरपरिषदेच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, शहराच्या हद्दीत मृतावस्थेत आढळलेल्या बेवारस प्रेताची शवविच्छेदनानंतर अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र वाहनातून विल्हेवाट लावण्याची आवश्यकता आहे.

हे काम कचरा संकलन करणाऱ्या ठेकेदाराला बंधनकारक असताना देखील एक बेवारस प्रेताची ग्रामीण रुग्णालयातून विल्हेवाट लावताना चक्क कचरा वाहणाऱ्या घंटा गाडीतून वाहून नेण्यात आल्याचा असंवेदनशील प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मृत्यूनंतरही माणसाच्या सन्मानाची अशी पायमल्ली होत असेल तर ही केवळ प्रशासकीय अथवा ठेकेदाराची चूक नसून मानवतेलाच काळिमा फासणारी बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे. नगरसेवकांचा गंभीर आरोप

या घटनेपूर्वी देखील अमरधाम स्मशानभूमीतील विदारक वास्तवही समोर आले होते. प्रभाग क्रमांक ३ च्या नगरसेविका शोभाबाई गढरे, राष्ट्रवादी युवकचे शहर अध्यक्ष दुर्गेश पाटील यांनी केलेल्या आरोपांनुसार, अंत्यसंस्कारासाठी पुरेसे सरण (गौरी )उपलब्ध नसल्याने अनेक मृतदेह पूर्णपणे जळत नाहीत. परिणामी अर्धवट जळालेल्या अवशेषांची भटक्या कुत्र्यांकडून लचके तोडून विटंबना होत असल्याचे प्रकार वारंवार घडत होता. याशिवाय स्मशानभूमीत कायमस्वरूपी कर्मचारी नसल्याने दुःखाच्या प्रसंगी आलेल्या नातेवाईकांनाच सर्व व्यवस्था स्वतः करावी लागत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली होती.

## खासदार फोडाफोडीशी भाजपचा संबंध नाही; बावनकुळेंचा खुलासा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, नागपूर :** राज्यात पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मोठा राजकीय धक्का बसला आहे. ठाकरे गटाचे सहा खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात जाणार असून, हे भाजपच्या वतीने करण्यात आल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र, महसूल तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपचा याच्याशी काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट करताना उद्धव ठाकरे यांनी आत्मचिंतन करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले आहे.

बावनकुळे बुधवारी प्रसारमाध्यमांशी नागपुरात बोलत होते. ठाकरेंचे खासदार पक्ष सोडत असल्याबद्दल भाजपला या विषयात गोवणे अयोग्य आहे. उद्धव ठाकरे यांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र देऊन त्यांच्या खासदारांबाबत हालचाली सुरू असल्याची भीती व्यक्त केली आहे. मात्र, या विषयाची संपूर्ण माहिती ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच आहे.

आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीला जातील आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होतील, असे केलेल्या वक्तव्याबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले, प्रत्येकाला आपली भावना व्यक्त करण्याचा अधिकार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीला नेण्याबाबतच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना



बावनकुळे म्हणाले, हे कुणाच्या हातात नाही. मात्र, २०२९पर्यंत महाराष्ट्राला अधिक मजबूत आणि प्रगत राज्य बनविण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस सातत्याने कार्यरत आहेत. त्यामुळे अशा चर्चांना फारसे महत्त्व देऊ नये.

**ही तर महाविकास आघाडीशी गद्दारी – हर्षवर्धन सपकाळ**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून सहा खासदारांनी केलेली बंडखोरी ही फक्त उद्धव ठाकरे व त्यांच्या शिवसेनेशी केलेली गद्दारी नाही; तर काँग्रेस महाविकास आघाडीशीसुद्धा त्यांनी गद्दारी केलेली आहे, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. जनतेने यांना महायुतीच्या विरोधात मतदान करून विजयी केले, त्यांचा हा विश्वासघात आहे, अशा गद्दारांना यापुढे जनताच धडा शिकवेल, असा इशाराही सपकाळ यांनी दिला.

अक्षराज






## तर दुर्लक्ष ठरेल जीवघेणे

लखनौमध्ये आगीत होरपळून १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. दिल्लीत एका हॉटेलला आग लागून २१ जणांना जीव गमवावा लागला. या घटनांच्या पार्श्वभूमीवर कोलकात्यातील रुग्णालय, नाशिक, मुंबईत घडलेल्या घटना स्मरतात. रुग्णालये, हॉटेले, कोचिंग क्लास आदी ठिकाणी आगीच्या दुर्घटना घडल्यावर दोन दिवस धावपळ होते. दोषी कोण, फायर एनओसी होते का, इमारतीला परवानगी किती मजल्यांची होती, ऑडिट कधी झाले असे प्रश्न विचारले जातात. आणि काही दिवसांत सगळेच सारे विसरून जातात

सर्वसाधारणपणे मंगल कार्यालये, हॉटेले, शाळा, रुग्णालये, कोचिंग क्लासेस, चित्रपटगृहे अशा ठिकाणी लोकांची दाटीवाटी असते. अशा ठिकाणी आरोग्य सुविधांपासून अग्निशमन यंत्रणेपर्यंत सारे काही असेल तर अपघात टाळता येतील. पण अपवाद वगळता राज्यभरातील सर्वच मोठ्या शहरांमध्ये या यंत्रणा उभ्या करताना दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे चित्र दिसते. त्याचा फटका सर्वसामान्यांना बसतो. नवीन आस्थापना उभारल्यानंतर अग्निशमन यंत्रणा उभी करून 'ना हरकत प्रमाणपत्र' घेणे नियमानुसार बंधनकारक आहे. छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर, नाशिक, सोलापूर यांसह प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाणपत्र घेणाऱ्या आस्थापनांची संख्या तुलनेने फारच कमी असल्याचे दिसून येते.

लखनऊतील दुर्घटनेनंतर आपल्याकडेही याची चर्चा सुरू झाली. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या अग्निशमन विभागाने ३१ आस्थापनांची यादी 'फायर एनओसी'साठी तयार केलीय. त्यात हॉटेले, बार-रेस्टॉरंट, रुग्णालये, पेट्रोल व डिझेल पंप, गॅस एजन्सीज, शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, सरकारी इमारती यांचा समावेश आहे. १५ लाखांहून अधिक लोकसंख्येच्या या शहरात अग्निशमन विभागाकडे केवळ ४४२७ अर्ज 'फायर एनओसी'साठी प्राप्त झाले आहेत. आस्थापनांची अंदाजे संख्या गृहित धरली तर प्राप्त अर्जाच्या आकडेवारीच्या कितीतरी अधिक पटीने अर्ज यायला हवे होते. यंत्रणेने ११३९ अर्जांचा विचार करून अंतिम 'फायर एनओसी' दिली. कागदपत्र व अग्निशमन उपकरणांची पूर्तता न केल्याने उर्वरित आस्थापनांना मंजुरी दिली गेली नाही. हे कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे विशेष. तरीही सगळे व्यवसाय सुरळीत सुरू आहेत. याला प्रशासन, यंत्रणांचे दुर्लक्ष म्हणावे की आणखी काही?

अग्निशमन यंत्रणेकडून परवानगी घेण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता का केली गेली नाही, अशी विचारणा मात्र होत नाही. अग्निशमन उपकरणे का लावली गेली नाहीत? यंत्रणा तपासणी का करत नाही? एखादी दुर्घटना घडेपर्यंत का वाट पाहिली जाते? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. दुसरीकडे हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी असलेली पद्धत सुटसुटीत व सुलभ आहे का, याचीही तपासणी केली गेली पाहिजे.

नवीन इमारत बांधताना वा व्यवसाय, उद्योग सुरू करताना प्राथमिक परवानगी मागितली जाते. त्यावेळी यंत्रणांनी स्थळपाहणी करून सूचना द्याव्यात आणि अंतिम मंजुरी देण्यापूर्वी त्याची पूर्तता करून घेण्याची सक्ती करावी. काही ठिकाणी तर अग्निशमन विभागात काम करणाऱ्या प्रमुख अधिकाऱ्यांनी शिफारस केलेल्या ठिकाणाहूनच अग्निशमन उपकरणे खरेदी केली तरच 'ना हरकत प्रमाणपत्र' विनासायास मिळण्याची सोय आहे! उपकरणे खरेदी केल्याचा तपशील संबंधित अधिकाऱ्यांना सादर केला की प्रमाणपत्र मिळते. ती उपकरणे लावण्यात आली आहेत का याची पडताळणी मात्र क्वचितच होताना दिसते, असे काहीजण खासगीत सांगतात. क्लिष्ट पद्धती मोडीत काढून सुलभ पद्धतीने मंजुरी देणे, वेळोवेळी तपासणी करून यंत्रणा कार्यान्वित आहे की नाही याची तपासणी करणे, वर्षाला संबंधित आस्थापनेकडून महापालिकेच्या वा संबंधित यंत्रणेच्या अग्निशमन विभागाकडे तपासणी अहवाल सादर करणे याकडे गांभीर्याने लक्ष दिले तर अनेक अडचणी सुलभपणे सुटतील. नाहीतर याकडे होणारे दुर्लक्ष महागात पडू शकते.

– मकरंद कुलकर्णी

# निराश करणारा निकाल, न्यायदेवतेची शोकांतिका..?








वीस वर्षे तब्बल दोन दशके. एका लोकनेत्याच्या आणि त्याच्या वाहन चालकाच्या हत्येचा खटला चालला आणि शेवटी २० जून २०२६ रोजी मुंबईच्या विशेष सीबीआय न्यायालयाने माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह नऊच्या नऊ आरोपींना निर्दोष सोडले. न्यायालयाचा निर्णय न्यायालयासमोर आलेल्या साक्षीपुराव्यांच्या आधारे कायद्याच्या चौकटीत असल्याने त्याविषयी दुमत असण्याचे कारण नाही. न्यायव्यवस्थेवर येथील जनतेचा विश्वास असतो आणि आहे.

परंतु, न्यायालयासमोर न्यायालयासमोर प्रकरण कसे यायला हवें, हे सर्वस्वी तपास यंत्रणांवर अवलंबून असते. जर तपास यंत्रणा सत्तेच्या बरहुकूम काम करत असतील तर न्याय मिळवणे कठीण असते, सामान्यांचा हा घातक समज आणखी मजबूत होणे निराश करणारे आहे. पवनराजे निंबाळकर यांची ३ जून २००६ रोजी कळंबोलीत झालेल्या गोळीबारात हत्या झाली होती. पवनराजे निंबाळकर आणि समद काझी यांच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या. दोघे जागीच ठार झाले. तेव्हापासून त्यांचा मुलगा, धाराशिवचे विद्यमान सदार ओमराजे निंबाळकर न्यायासाठी लढत होते. वीस वर्षे त्यांनी कोर्टाच्या पायऱ्या झिजवल्या. निकालाच्या दिवशीही ते कोर्टात हजर होते. न्यायाधीश एस.आर. नावंदर यांनी स्वतः निकालाबाबत खंत व्यक्त केली. ही खंत येथील न्यायव्यवस्थेला जबाबदार असलेल्या तपास यंत्रणांना दबावात घेणाऱ्या सत्तेविषयी असल्याचे स्पष्ट व्हावे. न्यायालय वस्तुनिष्ठ पुराव्यांनुसार निर्णय देते, न्यायालयासमोर येणाऱ्या प्रकरणांविषयी न्यायाधीशांचे व्यक्तीशः मत काय काय आहे, हा प्रश्न यायालयीन प्रक्रियेचा भाग नसतो. या प्रकरणाविषयी निकाल देताना न्यायालयाने केलेली टिपण्णी महत्वाची आहे. 'लोकनेत्याची हत्या होणे दुर्दैवी आहे. निकालाला २० वर्षे लागल्याबद्दल तीव्र खंत आहे, असे न्यायाधीश म्हणाले. उशिरा मिळालेला न्याय हा न्याय नाकारल्यासारखाच असतो, अशा आशयाची इंग्रजी म्हण आहे. न्यायालयाने व्यक्त केलेली खंत न्यायव्यवस्थेच्या मर्यादा स्पष्ट करणारी आहे. या निकालात सर्वच आरोपी निर्दोश सुटले, मग खरे दोषी कोण ? हत्येची घटना झालीच नाही का? जर हत्या झाली तर ती करणारेही असतीलच की? मग निर्दोष कोण सुटले? खरे मारेकरी तपास यंत्रणांनी पकडलेच नाहीत का? जर पकडले असतील तर त्यांना कायद्यानुसार शिक्षा का झाली नाही? निकाल येण्यासाठी २० वर्षांचा कालावधी हा मोठा नव्हता का? या खटल्याच्या तपासात जाणीवपूर्वक कच्चे दुवे ठेवले गेले का? हा खटला एका अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या हत्येच्या तपासातील ढिसाळ कारभाराचा नमुना ठरावा. जर मोठ्या नेत्यांच्या हत्येनंतर असल अशी स्थिती असेल तर सर्वसामान्यांनी निष्पक्ष न्यायाची अपेक्षा कोणाकडून ठेवावी?

न्यायालयाने स्पष्टच सांगितले की, खटल्याचा पाया ठिसूळ होता. संपूर्ण खटला ज्या माफीचा साक्षीदार पारसमल जैन याच्यावर उभा होता, त्यानेच तीन वेळा आपली साक्ष बदलली. त्याने त्याच्यावर दबाव असल्याने साक्ष दिल्याचे सांगितले. असा जबाब कोर्ट कसा मान्य करणार? न्यायमूर्तींनी त्याला फितूर घोषित केले. याशिवाय सीबीआयने मोबाईल जप्त केले नाहीत, कॉल डिटेल्स गोळा केले नाहीत. एकविसाव्या एकविसाव्या शतकात, जिथे एका मिस्ड कॉलवरून माणूस सापडतो, तिथे हायप्रोफाइल हत्येच्या तपासात सीबीआयसारखी संस्था प्राथमिक पुरावेच गोळा करत नाही, हे अनाकलनीय आहे. पवनराजेंच्या पत्नी आनंदीदेवी यांची साक्षही न्यायालयाने अम् अमान्य केली. म्हणजे तपास करणारी सर्वोच्च अशी सीबीआय ही केंद्रीय यंत्रणा या ठिकाणी सपशेल अपयशी ठरली.

या प्रकरणात गुन्हा आरोपींनी केला हे सिद्ध होत नाही, असे न्यायालय म्हणाले. आरोपींनी गुन्हा केला नाही असे न्यायालय म्हणत म्हणत नाही. कायद्याच्या भाषेत ते निर्दोष आहेत. पण जनतेच्या मनातला संशय? तो कायम आहे. आणि हाच आपल्या व्यवस्थेचा सर्वात मोठा पराभव आहे. न्यायव्यवस्थेची मानहानी म्हणजे काय? फक्त कोर्टावर शाई फेकणे किंवा न्यायव्यवस्थेविरोधात घोषणा देणे ही मानहानी नाही. जेव्हा वीस वर्षे खटला चालूनही सत्य बाहेर येत नाही, तेव्हा मानहानी होते. पवनराजे निंबाळकर यांची हत्या झालीच नाही का? संतापाच्या भरात असे शब्द तोंडात येतात. पण सत्य हे आहे की हत्या झाली. दोन कुटुंबे उद्ध्वस्त झाली. एका जिल्ह्याने आपला नेता गमावला. फक्त मारेकरी कोण, हे व्यवस्थेला वीस वर्षांत शोधता आले नाही, ही शोकांतिका आहे. हेच या निकालाने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आपल्या देशात मोठ्या लोकांविरुद्धचे खटले कसे चालतात. वारंवार मिळणाऱ्या तारखा, पुरावे गोळा करण्यात दिरंगाई. साक्षीदार फोडणे किंवा त्यांच्यावर दबाव आणणे आणि शेवटी संशयाचा फायदा देऊन सुटका. या सगळ्यात सामान्य माणसाचा कायद्यावरचा, पोलिसांवरचा, सीबीआयवरचा आणि कोर्टावरचा विश्वास उडतो. हा उडालेला विश्वास खूपच निराश करणारा असतो. ज्यांच्याकडे पैसा आणि सत्ता आहे, त्यांना कायदा कसाही वाकवता येतो, हे वाक्य लोकशाहीसाठी घातक आहे. पवनराजे प्रकरण एकमेव नाही. असे शेकडो खटले वर्षानुवर्षे धूळ खात पडले आहेत. त्यातल्या आरोपींना शिक्षा होईल याची शाश्वती नाही, पण मृतांच्या कुटुंबीयांना शिक्षा मात्र रोज मिळते, दीर्घकाळ न्यायाची प्रतीक्षा केल्यावर पदरात असा 'निराश करणारा' निकाल पडत असेल तर तो अन्यायापेक्षाही जास्त धक्कादायक असतो.

# आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी

आपण ना खाऊंगा, ना खाने दूंगा मी भ्रष्टाचार करणार नाही आणि कोणाला करूही देणार नाही ही घोषणा केली.

ही केवळ एक राजकीय घोषणा नसून, ती सुशासनाची आणि पारदर्शकतेची एक महत्त्वाची त्रिसूत्री आहे. आपण २०१४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान आणि त्यानंतरच्या काळात हा नारा देऊन देशातील भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढ्याला एक नवी दिशा दिली. भ्रष्टाचार ही आपल्या देशाची जुनी आणि सर्वात मोठी समस्या राहिली आहे. शासकीय कार्यालयातील छोट्या कामांपासून ते मोठ्या सरकारी करारांपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे खोलवर रुजलेली पाहायला मिळतात. या पार्श्वभूमीवर ना खाऊंगा, ना खाने दूंगा हा विचार देशाच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर अत्यंत प्रभावी ठरला आहे.याचा अर्थ व्यवस्थेच्या सर्वोच्च स्थानी बसलेली व्यक्ती स्वतः पूर्णपणे प्रामाणिक राहील आणि भ्रष्टाचारापासून दूर राहील. जेव्हा देशाचा नेता स्वतः निष्कलंक असतो, तेव्हा संपूर्ण प्रशासनाला एक सकारात्मक संदेश जातो.

**'ना खाने दूंगा' मी कोणाला लाच घेऊ देणार नाही**

याचा अर्थ केवळ स्वतः प्रामाणिक राहून चालणार नाही, तर हाताखालील अधिकारी, मंत्री किंवा इतर कोणत्याही घटकाला भ्रष्टाचार करण्याची सूट दिली जाणार नाही. यासाठी कडक कायदे आणि पारदर्शक यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. आपल्याला भ्रष्टाचार मुक्त भारत बनवायचा आहे हे आपले स्वप्न आहे. त्यामुळे आपण आपली भूमिका जाहीर केली आहे ना खाऊंगा ना खाने दूंगा. अर्थात भ्रष्टाचार करणार नाही आणि करुही देणार नाही. परंतु– ना खाने दूंगा... म्हणजे भ्रष्टाचार करू देणार नाही हा भाग मात्र जवळपास जैसे थे आहे. आज आपण जर वर्तमानपत्र उघडले तर पानोपानी भ्रष्टाचाराच्या बातम्या वाचायला मिळतात. अर्थातच हा भ्रष्टाचार अनेक प्रकारांचा असतो तो अगदी खाली तलाठ्यापासून तर उच्च प्रशासकीय अधिकार्यापर्यंत असतो, आमदार, खासदार, राजकीय पदाधिकारी, आता त्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद हे सर्व कार्यालय येतात. कितीही म्हटले तरी तो यामधील भ्रष्टाचार अद्याप पर्यंत थोपवता आलेला नाही. त्याचीही अनेक कारणे आहेत.

आपल्या मनात जरी भ्रष्टाचार मुक्त भारत ही संकल्पना असली तरीपण आज आपण बघत आहोत, तसे वातावरण नाही. ज्या त्या क्षेत्रात भ्रष्टाचार माजलेला आहे. अगदी गाव पातळीपासून भ्रष्टाचाराची मूळ आहेत आणि वरती तर मग त्याचा वृक्ष झालेला आहे .आज मितीला जर बघितले तर सहकार खाते, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, अन्न नागरी पुरवठा,अन्न औषध प्रशासन, महसूल, कृषी, गृह, उर्जा, वन, ग्राम विकास, आदिवासी विकास, ग्राहक विभाग , शिक्षण विभाग,सर्व खाते भ्रष्टाचाराचे कुरणे आहेत.

अन्न औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे ज्या धडाडीने भेसळखोरी व त्यातील भ्रष्टाचार गुटका विक्री विषयी जी मोहीम राबवत आहेत अशाच प्रकारे सर्वच खात्यामध्ये मोहीम राबविणे आवश्यक आहे. म्हणजेच अशा अधिकाऱ्यांमध्ये तशीच मानसिकता तयार करणे आवश्यक आहे.

आपण कठोर पावले उचलण्याचा निर्धार केलेला आहे.तर त्या दृष्टीने विचार करुन अधिकाऱ्यांच्या नेमणुका करून त्यांना स्पष्ट निर्देश देणे आवश्यक आहे.

अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येतात.अनेक योजनेत सर्वसामान्य शेतकऱ्यांना लाभ मिळतच नाही. ठराविक लोकांना लाभ मिळतो. त्यात मोठे प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. तो थोपवण्याचे आव्हान आहे.( पंचायत समितीच्या पातळीवरील योजना.) अगदी सातबारा उतारावरील पक्की नोंद करण्यासाठी पैशाची मागणी केली जाते, शेतात वीज कनेक्शन घेताना पैशाची मागणी केली जाते, जिल्हा परिषद मधून शिक्षण विभागातून पगार काढण्यासाठी पैशाची मागणी केली जाते,मुलांना शाळेत प्रवेशासाठी डोनेशन ची मागणी होते. वनविभागात वृक्ष लागवडीमध्ये भ्रष्टाचार होतो, सरकारी धान्य गोडाऊन मधून माल बाहेर विकला जातो. शेतकऱ्याला शेडनेट मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात, तसेच बऱ्याच वेळा निरनिराळे कर्ज मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात. मंत्रालयापासून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयापर्यंत कुठेही सर्वसामान्य माणसाचे काम सहजरीत्या होत नाहीत. ही साखळी अनेक वर्षांपासून तशीच आहे. लाखाच्यावर पगार असणाऱ्या शासकीय सेवेतील कर्मचारी लाच घेताना कचरत नाही आणि त्यांनाही काही वाटत नाही. लाखाच्या वर पगार घेणारा कर्मचारी सर्व सामान्य शेतकऱ्याकडून सुद्धा पैशाची मागणी करतो,आणि घेतो, ही अतिशय शरमेची गोष्ट आहे. या सगळ्या गोष्टींना कुठेतरी लगाम घालणे आवश्यक आहे. भूमी अभिलेख कार्यालयात अनेक दलालांचा वावर असतो. नाव लावण्यासाठी या ठिकाणी दर ठरलेले आहेत आणि यातील वाटा साहेबांना द्यावा लागतो असे सांगून दलाला कडून सर्वसामान्यांची लूट करण्यात येते. एन.ए. प्रस्ताव मंजूर करण्यासाठी लाच मागीतली जाते. तहसीलदार महसूल सहाय्यक, तलाठी आणि खाजगी व्यक्ती असा गुन्हा दाखल होतो. गोठा, सिंचन, विहिरी तसेच इतर योजनांच्या फाइल्स २५% रक्कम घेतल्याशिवाय पुढे सरकत नाहीत. यामध्ये कर्मचारी अधिकारी नेत्यापर्यंतची साखळी असल्याचा स्फोट ग्राम विकास मंत्री करतात. जर असेच सुरू राहिले तर आपले भ्रष्टाचार मुक्त भारताचे स्वप्न कसे पूर्ण होईल ? बोगस बी बियाण्यामुळे शेतकऱ्यांना खूप मोठा फटका बसतो परंतु कंपन्यांवर कडक कारवाई होत नसल्यामुळे आणि त्यातही भ्रष्टाचार असल्यामुळे ते शक्य होत नाही उपविभागीय कृषी अधिकारी यांना एक लाख रुपयाची लाच घेताना रंग हात पकडले जाते. कृषी संजीवनी योजनेतून घेतलेल्या शेडनेटचे बिल काढण्यासाठी पैशाची मागणी केली जाते .तर भूसंपादन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवण्यासाठी लाच स्वीकारतांना उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात येते. वाळू माफिया कडून काही लाख लाच घेतांना तहसीलदाराला रंगेहाथ पकडले जाते. सर्वसामान्य शेतकऱ्याकडून विहीर अनुदान मंजुरीसाठी तिसहजार रुपये पंचायत समिती अधिकार्याने घेतल्याची बातमी प्रसिद्ध होते.उपसंचालक दर्जाच्या महिला अधिकाऱ्या कडून जात प्रमाणपत्रासाठी अडीच लाख रुपयाची लाच घेताना पकडला जातो.थकीत देयके काढण्यासाठी गटशिक्षणाधिकारी व काही अधिकारी लाच घेताना सापडतात. महापालिकेच्या निवृत्त अभियंता दोन हजार कोटी रुपयांची बेहिशेबी मालमत्ता सापडल्याची बातमी तसेच किरकोळ गोष्टीमध्ये पैशाचे मागणी होत असल्याच्या अनेक बातम्या आपण नेहमीच वाचतो.

असे एक ना अनेक भ्रष्टाचारी प्रकरणे आपल्याला पाहायला मिळतात. लाच लुचपत विभागामार्फत सापळे रचले जातात भ्रष्टाचारींना पकडण्यात येते परंतु त्याचे पुढे काय होते ? हे मात्र समजत नसते. ते प्रश्न अनुत्तरीतच राहतात. बऱ्याच वेळी असे अधिकारी परत त्याच पदावर स्थानापन्न झाल्याच्या बातम्या आपण वाचतो. असे का घडते.?

त्या दृष्टीने अशा केलेल्या कार्यवाहीचा आणि कारवाईचा अहवाल वेळोवेळी प्रसिद्ध व्हायला हवा जेणेकरून जनतेमध्ये जागृती निर्माण होईल. भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांना सामील करून घेण्याच्या गरजेवर पंतप्रधानांनी भर दिला आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी किती शक्तिशाली असला तरी त्यांना वाचवायचे नाही ही जबाबदारी अनेक संस्थांची आहे तसेच त्या व्यक्तीला राष्ट्रीय सामाजिक पाठबळ मिळायला नको अशा वातावरण निर्मितीची गरज आहे. परंतु भ्रष्टाचाराची तक्रार केल्यास आपल्याला त्रास होईल व का होणार नाही या भीतीतूनच सर्वसामान्य जनता पैसे देऊन काम करून घेणे पसंत करतात.

एका कार्यक्रमात एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना प्रश्न विचारला, मंत्री तर जाऊ द्या,पण साधा आपला नगरसेवक यावर्षी निवडून आला की पुढच्या वर्षी मालामाल होतो.कोट्याधीश होतो. मला कळतं सगळ्यांनाच कळत, तुम्हालाही कळत, पण आपण बोलत नाही. त्याची चौकशी व्हायला नको का ? परंतु त्याचे उत्तर मुख्यमंत्री यांनी न देता,देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आपण म्हणतात ते बरोबर आहे. पण परिस्थितीच अशी आहे की आज भ्रष्टाचाराच्या आरोपातून बाहेर आलेल्या, अनेक चौकशात, घोटाळ्यात अडकलेल्यां ना लोकांची पसंती असते. तो मोठ्या मताने निवडून येतो आमचा नाईलाज असतो.

जनतेने खरं खोटं चांगलं वाईट हे ओळखायला पाहिजे त्याची गरज आहे. परंतु फडणीसांनी दिलेले हे उत्तर फारसे संयुक्तिक वाटत नाही.

आपण स्वतः इतके स्वच्छ असताना मग अशा भ्रष्ट लोकांना सामावून घेतात मग भ्रष्टाचार मुक्त भारत हे स्वप्न पंतप्रधान उराशी बाळगून आहेत ते कसे पूर्ण होणार.??
सरकार कोणाचेही असो पक्ष कोणताही असो पण अशा लोकांना राजकारणापासून त्यांची जागा त्यांना दाखवली पाहिजे, त्यांना निवडणुकीत निवडून द्यायला नको तरच हे शक्य आहे . अधिकाऱ्यांच्या बाबतीत कडक धोरण ठेवायला हवे, नाहीतर अशा लोकांचा उदो उदो सुरू राहिला तर ही भ्रष्टाची कीड अशीच वाढत जाणार आहे. आणि म्हणून जो प्रश्न एकनाथ शिंदे यांना विचारला तोच प्रश्न पंतप्रधान म्हणून आपल्यालाही आहे असे समजण्यास काही हरकत नाही.

नगरसेवक असो पंचायत समिती सदस्य अध्यक्ष जिल्हा परिषद अध्यक्ष सदस्य जिल्हा बँक अध्यक्ष संचालक, दूध संघ मार्केट कमिटी महामंडळ अध्यक्ष सदस्य मंत्री आमदार खासदार त्यांचे अगदी जवळचे कार्यकर्ते सहाय्यक ही मंडळी थोड्या दिवसातच मालामाल होत असतात हे काही लपून राहत नाही. परंतु हा प्रश्न स्वतःला प्रधान सेवक म्हणून घेतात तर आपल्याला कोण विचारणार ?

ही परिस्थिती न बदलण्यास जनताही आहे तेवढीच कारणीभूत आहे . आपले काम पैसे देऊन करून घ्यायचे आणि भ्रष्टाचारावर गप्पा करायच्या.

यापुढे ज्याच्यावर गुन्हे दाखल आहेत, तुरुंगवास भोगून आले आहे, असे आमदार खासदार मंत्री यांचे पेन्शन आणि इतर सवलती तसेच प्रशासकीय अधिकारी कर्मचारी अशा प्रकरणात असतील, भ्रष्टाचारात असतील त्यांचे सुध्दा पेन्शन ग्रॅच्युइटी गोठवायला हवे. निवृत्तीनंतरसरकारी अधिकारी यांचे संपत्तीची चौकशी व्हायला हवी. तरच अशा कडक कारवाईमुळे ना खाऊंगा ना खाने दूंगा याला काही अर्थ प्राप्त होईल.

राष्ट्रीय पातळीवर धोरणात्मक भ्रष्टाचार रोखण्यात आणि तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता आणण्यात यश आले असले तरीही , तळागाळातील संपूर्ण भ्रष्टाचार संपवणे आणि राजकीय विरोधकांच्या आरोपांना उत्तर देत या नाऱ्याची विश्वासार्हता टिकवून ठेवणे हे यापुढील काळातही एक मोठे आव्हान असेल.

ना खाऊंगा, ना खाने दूंगा हा केवळ एका नेत्याचा नारा राहू नये, तर तो प्रत्येक नागरिकाचा जीवनमंत्र बनला पाहिजे. जोपर्यंत सामान्य जनता लाच देणार नाही आणि भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवणार नाही, तोपर्यंत यंत्रणा पूर्णपणे स्वच्छ होऊ शकत नाही. भारत देशाला आर्थिक महासत्ता आणि एक आदर्श राष्ट्र बनवायचे असेल, तर या घोषणेची अंमलबजावणी प्रशासनाच्या अगदी खालच्या पातळीपर्यंत प्रामाणिकपणे होणे गरजेचे आहे.

**आपला स्नेही**
**हितचिंतक.**
**भारतीय नागरिक**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पुण्याचे प्रसिद्ध कवि हेमंत मुसरीफ यांच्या साहित्य सेवेत अजून एक मानाचा तुरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, पुणे :** पुण्याचे प्रसिद्ध कवि व बँक ऑफ महाराष्ट्रचे (नि.) उप महाप्रबंधक हेमंत मुसरीफ यांच्या साहित्य सेवेत अजून एक मानाचा तुरा खोवला आहे. बालभारती मराठी इयत्ता चौथी..शिकू मराठी आनंदाने... पाठ्यपुस्तकात त्यांची 'झोका' कविता अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे.

यापूर्वी पहिली व दुसरीच्या पाठ्यपुस्तकात सुध्दा कविता पाच पाच वर्षांसाठी समाविष्ट होत्या. सध्या त्यांच्या रोज ६०/ ७० जागी कविता प्रकाशित होत असतात. आजवर सुमारे १ लाख ७ हजार हून अधिक कविता प्रकाशित झाल्या आहेत. गत वर्षी विविध दिवाळी अंकात १०० हून अधिक कविता प्रकाशित झाल्या आहेत.

रसिक वर्ग, संपादक मंडळ व हितचिंतकाचे प्रेम व विशेषतः दत्त गुरु महाराज आशिर्वाद यामुळे हे शक्य झाले आहे असे त्यांनी मनोगत व्यक्त केले आहे.

लहानपणा पासून ते कविता करत आहेत पहिली कविता १३ व्या वर्षीआनंद या प्रसिद्ध मासिकात प्रकाशित झाली. त्यांचे आकाशवाणी पुणे वर ५ वेळा काव्यवाचन झाले आहे. असंख्य बक्षिसे व सन्मानचिन्ह प्राप्त झाले आहेत.

बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये उच्च पदस्थ जबाबदारी सांभाळताना, मधल्या काळात त्यांनी काव्य लेखनास अल्प विराम दिला. पण निवृत्ती नंतर अन्य आर्थिक क्षेत्रात रूजू न होता केवळ काव्यलेखनास वाहून घेतले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून व क्षेत्रातून आनंद व्यक्त करण्यात येत आहे व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी स्नेहा मुसरीफ यांचे सुमारे २००० लेख प्रवास वर्णन कथा प्रकाशित झाल्या आहेत..३५०० रेसीपी प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचे झी टिव्ही ई टीव्ही वर कार्यक्रम झाले आहेत.

## 'महाबळेश्वर टाईम्स'कडून शालेय साहित्याचे वाटप



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२७, महाबळेश्वर :** महाबळेश्वर नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक १ व २ येथे इयत्ता १ ली ते ५ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच महाबळेश्वर टाईम्सच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांचा गौरव व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना शिवसेना शहरप्रमुख विजयभाऊ नायडू यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, लहानपणापासूनच चांगल्या सवयी आणि अभ्यासाची आवड जोपासण्याचे आवाहन केले. आजचा सन्मान हा विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे फळ असून शिक्षकांचे परिश्रमही तितकेच मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ पत्रकार संजय दस्तुरे यांनी विद्यार्थ्यांच्या यशामध्ये पालकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिल्यास त्यांना अधिक चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले.

महाबळेश्वर टाईम्सचे संपादक व महाराष्ट्र पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष राहुल शेलार यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत, सामाजिक बांधिलकी म्हणून शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविल्याचे सांगितले. उपस्थित मान्यवरांनी महाबळेश्वर टाईम्स आणि महाराष्ट्र पत्रकार संघाच्या या उपक्रमाचे कौतुक करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास अर्बन बँकेचे संचालक ॲड. सतीश ओंबळे, नगरपालिकेचे मुख्य लिपिक बबन जाधव, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब पांचाळ, डेमोक्रॅटिक पक्षाचे कामगार जिल्हाध्यक्ष ऋषिकेश वायदंडे, आकाश झाडे, सामाजिक कार्यकर्ते राकेश देवकुळे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश सपकाळ, जांभळे, महाबळेश्वर टाईम्सचे कार्यकारी संपादक व महाराष्ट्र पत्रकार संघाचे उपतालुकाध्यक्ष रियाज मुजावर, मुख्याध्यापक यशवंत गोळे, शिक्षक दत्तात्रय पाडळे, रईसा शेख आणि रत्नावली ढेबे यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक यशवंत गोळे यांनी केले. रियाज मुजावर यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मान्यवरकडून शुभेच्छा व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सीडीसीसी बँकेकडून पीक कर्जाची ९४ टक्के लक्ष्यपूर्ती जिल्ह्यातील शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत यंदाच्या हंगामासाठी ८३५ कोटींच्या पीक कर्ज वाटपाचे लक्ष्यांक दिले असून, आजतागायत ७८८ कोटी पीक कर्ज वितरीत करण्यात आले आहे. यामाध्यमातून ९४ टक्के लक्ष्यपूर्ती झाली असून, जिल्ह्यातील शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नसल्याची माहिती बँकेमार्फत देण्यात आली आहे.

. बँकेमार्फत दरवर्षी साधारणत: ८० ते ८५ हजार शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी शासनाने निश्चित केलेल्या दराने पीक कर्ज वितरीत केले जाते. बँकेला संलग्न सेवा, विविध कार्यकारी, आदिवासी वि. का. सह. संस्थेमार्फत कर्ज वितरीत होत असूव, मागील खरीप हंगामात ८१८ कोटी पीक कर्ज वाटपाचे लक्ष्यांक प्राप्त झाले होते. ७७६.२६ कोटींचे पीक कर्ज वाटप केले गेले. बँकेच्या मंजूर उपविधी प्रमाणे बँकेचे कार्यक्षेत्र चंद्रपूर जिल्ह्यापुरते मर्यादित आहे. त्यामुळे जिल्ह्यातील रहिवासी असलेले व जिल्ह्यात शेती असलेल्या शेतकरीबांधवांना पीक कर्ज वितरण बँकेकडून केले जाते. जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सातबारा असलेल्यांना पीक कर्ज वितरण केले जात नाही. तसे झाल्यास उपविधी व नियमांचे उल्लंघन होईल. तसेच रिझर्व बँकेने जिल्हा बँकांकरीता दिलेल्या सुचनेनुसार नियमांचे व कायद्याचे पालन करणे बँकेस बंधनकारक आहे.

जिल्ह्यातील सर्व शेतकी सहकारी संस्था बँकेच्या भागधारक असून, शेतकी सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र निश्चित केले असल्याने जिल्ह्याबाहेरील शेतीवर कर्ज वितरण करणे शक्य नसल्याची माहिती बँकेनी दिली आहे.

## आईच्या स्मृतीस वंदन आणि एका देवमाणसाचे आभार..!

**गुरुवार, दिनांक २८ मार्च २०१९**

हा दिवस आणि तो काळ मी कधीच विसरू शकत नाही. आजही तो संपूर्ण प्रवास, ती जीवघेणी परिस्थिती माझ्या डोळ्यांसमोर जशीच्या तशी उभी राहते. माझ्या आईला ब्रेन हॅमरेजचा स्ट्रोक आल्यामुळे मी तिला नांदेडहून थेट मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो होतो. आई घरूनच कोमामध्ये होती. नांदेडहून मुंबईला जात असताना प्रवासात तिने एक-दोनदा डोळे उघडले, तेव्हा 'माझी आई बरी होईल' हा विश्वास अधिक घट्ट झाला. पण आईचे वय जास्त असल्याने डॉक्टरांनी आधीच सांगितले होते की, वाचण्याची शक्यता १०० पैकी फक्त १३ टक्के आहे, बाकी सर्व ईश्वराच्या हाती आहे.

माझी परिस्थिती अत्यंत बेताची होती, पण मी आणि माझा मित्र करण समेटवार यांनी धीर सोडला नाही. आम्ही डॉक्टरांना विश्वासाने सांगितले, तुम्ही प्रयत्न करा, पैशांची सोय आम्ही करू. मी मुंबईत विविध ट्रस्टकडे मदतीसाठी अर्ज घेऊन फिरत होतो आणि पुन्हा हॉस्पिटलला येऊन आईच्या तब्येतीची विचारपूस करत होतो. तब्बल १२ दिवस हा संघर्ष सुरू होता. आईची डोक्याची दोन मोठी ऑपरेशन्स झाली, कवटी काढून चिप बसवली गेली, पण तिच्या शरीराने साथ दिली नाही. अखेर २८ मार्च २०१९ रोजी सायंकाळी ठीक ६:०० वाजता आईची प्राणज्योत मालवली.

त्या दुःखद प्रसंगी माझ्यासोबत माझी मोठी बहीण संगीता आणि मावस भाऊ शिवकुमार गंगोने हे दोघेच होते. गावाकडे बातमी दिली, तिथे मित्र परिवार आणि समाज बांधव अंत्यविधीची तयारी करत होते. पण खरं संकट पुढे होतं. मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमधून आईचं 'पोस्ट मॉर्टम' न करता तिचे पार्थिव सन्मानाने गावी आणायचे होते. तोपर्यंत गुन्हा मागे घेणे (Case Withdraw), स्टेट पास मिळवणे, सर्व सर्टिफिकेट्स जमा करणे आणि डॉक्युमेंट स्कॅन करणे ही कायदेशीर प्रक्रिया बाकी होती. महिन्यावर भाचीचे लग्न होते, त्यामुळे बहीण खचली होती, तिला धीर द्यायचा की कागदपत्रे गोळा करायची, काहीच सुचत नव्हते. सोबतीला असलेला मावस भाऊही घाबरला होता कारण त्याला अनुभव नव्हता.

पण अशा अत्यंत बिकट आणि वेदनादायी परिस्थितीत 'धात्रक बंधू' आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. अशोक दादा धात्रक आणि संतोष दादा धात्रक या दोन्ही बंधूंनी त्या १२ दिवसांत डॉक्टरांशी बोलण्यापासून ते आमच्या जेवणाच्या डब्यापर्यंत सर्व काळजी घेतली आणि आईच्या निधनानंतर रुग्णवाहिकेची (Ambulance) व्यवस्थाही करून दिली.

दुसरीकडे, गावी असलेले राजूमामा पोतनकर यांनी मुंबईत असलेल्या आपल्या कुंडलवाडीच्या सुदर्शन दादा होनवडजकर यांच्याशी संपर्क साधला आणि जे. जे. हॉस्पिटलला भेट देण्यास सांगितले. मी घाबरलेल्या अवस्थेत पोलीस स्टेशनला पोहोचलो होतो, तेवढ्यात तिथे सुदर्शन दादा देवमाणसासारखे धावून आले. त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये येताच आधी कर्मचाऱ्यांना पाण्याच्या बाटल्या आणायला सांगितल्या आणि मला घट्ट गळामिठी मारली. माझ्या पाठीवर थाप टाकत ते म्हणाले, तू काहीच टेन्शन घेऊ नकोस, मी आहे तुझ्या पाठीशी! त्यांच्या त्या एका शब्दाने मला आभाळाएवढा धीर मिळाला. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता पोलिसांना



आवश्यक ते सर्व निर्देश दिले, स्टेट पास आणि सर्व कागदपत्रांवर सह्या घेतल्या. मला कोणताही त्रास होऊ न देता सर्व सर्टिफिकेट्स हातात सोपवले. तिथून ते माझ्यासोबत पायी चालत जे. जे. हॉस्पिटलमध्ये आले. तिथे सुरक्षा रक्षकांकडे पास नसल्याने त्यांनी आम्हाला अडवले, कारण आमच्याकडे एकच पास होता आणि माणसे जास्त होती. पण दादांनी तिथे आपल्या खास शैलीत कर्मचाऱ्यांना सुनावले आणि आम्हाला आत घेऊन गेले. रात्री उशिराची वेळ असल्याने स्कॅनिंगचे कर्मचारी नव्हते, डॉक्टर वेळेवर नव्हते; पण दादांनी डॉक्टरांना फोन करून बोलावून घेतले, कर्मचाऱ्यांना कामाला लावले आणि डेथ सर्टिफिकेट तयार करून दिले. रात्रीचा १ वाजला होता, तोपर्यंत दादा माझ्यासोबत तिथेच पाय रोवून उभे होते. मुंबई ही मायानगरी आहे, तिथे ओळख किंवा मोठा माणूस पाठीशी असल्याशिवाय जे. जे. हॉस्पिटलसारख्या ठिकाणी साधी दाद लागत नाही, हे मला कळून चुकले होते. जर त्या रात्री सुदर्शन दादा आणि धात्रक बंधू पाठीशी नसते, तर मी त्या परिस्थितीची कल्पनाही करू शकत नाही. रात्री १ वाजता आम्ही मुंबईहून निघालो आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ३ वाजता अंत्यविधीच्या वेळेवर पार्थिव घेऊन गावी पोहोचलो.

हे सर्व आज मांडण्याचे कारण म्हणजे, अशा या संकटसमयी धावून जाणाऱ्या आणि कर्तव्यदक्ष सुदर्शन होनवडकर दादांची नुकतीच बृहन्मुंबई कोकण - २ येथे 'सहाय्यक पोलीस आयुक्त' (ACP), मुंबई शहर या अत्यंत महत्त्वाच्या पदावर पदोन्नती झाली आहे!

मुंबईसारख्या अथांग महानगरात एवढी मोठी आणि जबाबदार पदे सांभाळत असतानाही, सुदर्शन दादांनी आपल्या मातृभूमीशी असलेले प्रेम आणि जिव्हाळा कधीच कमी होऊ दिला नाही. मुंबई असो वा इतर कुठलीही जागा, कोणावरही अडचण आली की एका फोनवर मदतीला धावून जाणारे 'विश्वासाचे नाव' म्हणजे सुदर्शन दादा! त्यांच्या याच अफाट कर्तृत्वाची, प्रामाणिकपणाची आणि कर्तव्यनिष्ठेची योग्य दखल शासनाने घेतली आहे.

आदरणीय सुदर्शन दादा, सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) पदी पदोन्नती झाल्याबद्दल आपले मनापासून हार्दिक अभिनंदन!

दादा, स्वभाव तुमचा वरून जरी कठोर वाटत असला, तरी आतून तुम्ही अत्यंत प्रेमळ आणि कनवाळू आहात. तुमच्या या यशामागे आणि पुढील प्रवासात नक्कीच माझ्या आईचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहतील. ईश्वराने तुम्हाला समाजकल्याण आणि जनसेवेचे हे कार्य अविरतपणे सुरू ठेवण्यासाठी उदंड आयुष्य आणि बल द्यावे, हीच प्रार्थना!

आजही दादा जेव्हा जेव्हा कुंडलवाडीत येतात, तेव्हा मी स्वतः आवर्जून त्यांची भेट घेतो आणि तो ऋणानुबंध जपत असतो.

**- आपलाच नम्र**
**दत्ता शोभाबाई राजेश्वर हमंद**
**एम ए इंग्रजी, एम ए राज्यशास्त्र**
**अध्यक्ष पत्रकार संरक्षण समिती, कुंडलवाडी, तथा छावा मराठा संघ सचिव, कुंडलवाडी.**

## महसूल विभागातील 'नशाबहाद्दर' टीम चर्चेच्या भोवऱ्यात..

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२७, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यात महसूल विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मंडळ अधिकारी पी. व्ही. हाके, ग्राम महसूल अधिकारी पी. एस. शिंदे, ग्राम महसूल अधिकारी एस. एम. मैड तसेच तहसील कार्यालयातील सहायक महसूल अधिकारी तथा प्रभारी अव्वल कारकून सत्यम हाके यांच्या गटाबाबत विविध आरोप होत असून, या पथकाला नागरिकांकडून 'नशाबहाद्दर टीम' अशी उपमा दिली जात असल्याची चर्चा आहे.

आरोपानुसार, संबंधित अधिकारी व कर्मचारी हे तहसीलदारांचे अधिकृत आदेश किंवा नियुक्ती नसताना स्वतःच्या कार्यक्षेत्राबाहेर जाऊन वाळू, मुरूम व दगड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईच्या नावाखाली कारवाया करतात. मात्र अधिकृत गुन्हा दाखल किंवा जप्तीची प्रक्रिया न करता आर्थिक तडजोड करून वाहने सोडली जात असल्याचा आरोप आहे. तसेच मुख्यालयी न राहणे, नियमबाह्य फेरफार करणे, वरिष्ठांची परवानगी न घेता गायरान वर्ग-२ जमिनीचे फेरफार मंजूर करणे आणि मुखेड येथेच कार्यालयीन कामकाज करून नागरिकांची गैरसोय केल्याच्याही तक्रारी समोर येत आहेत.

यातील कार्यालयीन कर्मचारी सत्यम हाके हे कार्यालयीन कामकाजाऐवजी वाहनांवर कारवाईच्या मोहिमेत सक्रिय असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दि. २४ जून २०२६ रोजी रात्री संबंधित अधिकारी व कर्मचारी एका हॉटेलमध्ये मेजवानी केल्यानंतर नांदेडकडे जात असताना सलगरा परिसरात एका हायवा वाहनाचा पाठलाग केल्याचा आरोप आहे. त्यावेळी ते मद्यधुंद अवस्थेत असल्याचा



दावा करण्यात येत असून, पैशांची मागणी करताना अश्लील भाषेचा वापर केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याची चर्चा आहे.

या घटनेनंतर काही सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या पडताळणीत मंडळ अधिकारी पी. व्ही. हाके यांचे कार्यक्षेत्र जाहूर, ग्राम महसूल अधिकारी पी. एस. शिंदे यांचे जांब, तर एस. एम. मैड यांचे चांडोळा असल्याचे समोर आल्याचा दावा करण्यात आला. तसेच सत्यम हाके हे कार्यालयीन कर्मचारी असूनही ते या कारवाईत सहभागी असल्याचेही सांगितले जात आहे.

याशिवाय तहसीलदार धनंजय राऊत यांनी दि. १ जून २०२६ रोजी गठित केलेल्या गौण खनिज तपासणी पथकाच्या आदेशात संबंधित कर्मचाऱ्यांचा समावेश नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कोणत्या अधिकाराने त्यांनी सलगरा परिसरात कारवाई केली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

काही कर्मचाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असल्याचा दावा केल्याचे समजते. या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. दरम्यान, या प्रकरणाची दखल मंत्रालय स्तरावरही घेतली जात असल्याची चर्चा असून, जिल्हाधिकाऱ्यांची पुढील भूमिका काय असेल, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## खा.संजय दिना पाटील यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार कारवाईची मागणी

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२७, मुखेड (नांदेड) :** पत्रकारांविषयी अभद्र भाषेचा वापर केल्याच्या आरोपावरून खासदार संजय दिना पाटील यांचा व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने महाराष्ट्रभर तीव्र निषेध करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील पत्रकार संघटनेच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षकांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले.



पत्रकार हा लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून समाजातील प्रश्न, अन्याय आणि जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार करत असतात. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींनी पत्रकारांविषयी अभद्र भाषा वापरणे ही गंभीर बाब असून लोकशाही मूल्यांना बाधक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

पत्रकारांना कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन किंवा आर्थिक सहाय्य मिळत नसतानाही ते आपल्या जीवाची पर्वा न करता समाजहितासाठी कार्यरत असतात. त्यामुळे पत्रकारांना संरक्षण देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. खासदार संजय दिना पाटील यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करून योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी एडवोकेट असलम शेख, सामाजिक कार्यकर्ते माणिकदादा गायकवाड, पत्रकार अशोक लोणीकर, शाकीर काझी, संजय राचलवार, बसूअप्पा वंडगिरे, जलील पठाण यांच्यासह पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# ठाणे पोलीस आयुक्तालयाची धडक कारवाई

## ३९ कोटींचा ६०० किलो अंमली पदार्थांचा साठा जप्त करून केला नष्ट

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, ठाणे :** संपूर्ण देशभरात अमली पदार्थांच्या विळख्यातून तरुण पिढीला वाचवण्यासाठी 'नशामुक्त भारत अभियान' अत्यंत प्रभावीपणे राबवले जात आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून, जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून ठाणे पोलीस आयुक्तालयाने ड्रग माफियांच्या विरोधात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई केली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये वेगवेगळ्या कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला तब्बल ३९ कोटी ३ लाख ४८ हजार ४०० रुपये किमतीचा आणि सुमारे ६०० किलो वजनाचा अंमली पदार्थांचा प्रचंड साठा पोलिसांनी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून पूर्णपणे नष्ट केला आहे. ठाणे शहराचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या थेट आदेशानंतर ही मोठी मोहीम राबवून सर्व अंमली पदार्थ नवी मुंबईतील तळोजा एमआयडीसी येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीत नेऊन शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आले, ज्यामुळे अमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

केंद्र सरकारच्या कायदेशीर निर्देशानुसार आणि अंमली पदार्थ विरोधी मोहिमेला गती देण्यासाठी ठाणे पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे. २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ दिनाचे औचित्य साधून केंद्रीय मुद्देमाल नाश समितीचे



अध्यक्ष तथा पोलीस सह आयुक्त (गुन्हे) डॉ.पंजाबराव उगले, समितीचे सदस्य तथा पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय १) मीना मकवाना आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विनय घोरपडे यांच्या मुख्य उपस्थितीत ही नष्टीकरण मोहीम पार पडली. ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत दाखल असलेल्या एकूण ११२ गंभीर गुन्ह्यांमध्ये हा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे व त्यांच्या विशेष पथकाने सर्व आवश्यक त्या कायदेशीर सोपस्कार आणि तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून या कोट्यवधींच्या ड्रग्जची होळी केली.

या धडक कारवाईत नष्ट करण्यात आलेल्या अंमली पदार्थांच्या अचूक आकडेवारीवर नजर टाकल्यास पोलिसांच्या कामगिरीची व्याप्ती स्पष्ट होते. पोलिसांनी ६६ गुन्ह्यांशी संबंधित ५६४ किलो ६७४ ग्रॅम वजनाचा गांजा नष्ट केला, ज्याची बाजारभावाप्रमाणे किंमत १ कोटी १३ लाख ५ हजार रुपये होती.

तसेच केवळ २ गुन्ह्यांमध्ये जप्त केलेला ८५ लाख ५० हजार रुपयांचा ८५५ ग्रॅम वजनाचा अत्यंत महागडा हायब्रिड गांजाही खाक करण्यात आला. सर्वात मोठी कारवाई एम.डी. (मेफेड्रोन) या जीवघेण्या अंमली पदार्थावर झाली, ज्यामध्ये २९ गुन्ह्यांतर्गत जप्त केलेले १३ कोटी ४३ लाख रुपये किमतीचे ६ किलो ७१५ ग्रॅम एम.डी. नष्ट करण्यात आले. याशिवाय ७ गुन्ह्यांमधील २० कोटी ९८ लाख २० हजार रुपये मूल्य असलेले २० किलो ९८२ ग्रॅम चरस, ७ गुन्ह्यांमधील २ लाख ९३ हजार ४०० रुपये किमतीच्या १४६७ कफ सिरपच्या बॉटल्स आणि १ गुन्ह्यातील २० लाख ८० हजार रुपयांची १०४ ग्रॅम ब्राउन शुगर अशा प्रकारे एकूण ५९४ किलो ३३२ ग्रॅम वजनाचा ठोस साठा आणि १४६७ कफ सिरपच्या बाटल्या असा एकूण ३९ कोटींपेक्षा जास्त रुपयांचा मुद्देमाल एकाच वेळी नष्ट करण्यात आला आहे.

ही अत्यंत संवेदनशील आणि मोठी कामगिरी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या थेट मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पूर्ण झाली. या मोहिमेत अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्यासह परिमंडळीय नोडल अधिकारी आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील, चंद्रहास गोडसे, जयपाल राजपूत, संदीप धांडे, संजय दवणे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कर्णवर-पाटील, पोलीस उपनिरीक्षक दीपक डुम्मलवाड, राजेंद्र निकम, मोहन परब आणि सहाय्यक रासायनिक विश्लेषक यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यासोबतच पोलीस हवालदार हरीश तावडे, अभिजीत मोरे, अमोल पवार, संदीप चव्हाण, नंदकिशोर सोनगिरे, हुसेन तडवी, अमोल देसाई, अमित सकपाळ, अजय सकपाळ, गिरीश पाटील, अनुप राक्षे, शिल्पा कसबे आणि कोमल लादे यांच्यासह संपूर्ण पोलीस पथकाच्या अहोरात्र मेहनतीमुळे ही यशस्वी जप्ती व विल्हेवाटीची कारवाई पूर्ण झाली असून, ठाणे पोलिसांनी नशामुक्त समाजासाठी आपला निर्धार पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

# खापरखेडा वीज केंद्राने जपली सामाजिक बांधिलकी

## रोप-वे कॉलनी परिसरातील पुरातन हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी १२ लाख मंजूर

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२७, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या अखत्यारीत असलेल्या रोप-वे वसाहतीतील परिसरातील पुरातन हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धार व विकास कामांसाठी १२ लाख रुपयांचा निधी खापरखेडा औष्णिक वीज केंद्र प्रशासनाने मंजूर केला असून शनिवार, दिनांक २७ जून २०२६ रोजी धार्मिक वातावरणात मुख्य अभियंता विवेक रोकडे यांच्या हस्ते भूमिपूजन पार पडले.

रोप-वे कॉलनी जीर्ण झाल्याने जमीनदोस्त करण्यात आली. मात्र, याठिकाणी असलेल्या पुरातन हनुमान मंदिरा प्रती भाविकांची ओढ कायम राहिली. बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन हनुमान मंदिरातील पूजा अर्चना व धार्मिक कार्य सातत्याने सुरू ठेवले. दर दिनांक २७ जून २०२६ रोजी या ठिकाणी शेकडो रामभक्त आणि हनुमान भक्त दर्शनासाठी गर्दी करतात.

यानिमित्ताने महाप्रसादाचे आयोजन केले जाते मात्र मंदिराचा विकास खुंटला होता.अखेर पुरातन हनुमान मंदिराचा कायापालट व्हावा व भाविकांसाठी उत्तम सोयी-सुविधा निर्माण व्हाव्यात या दृष्टीकोनातून स्थानिक कंत्राटदार असोसिएशन संघटनेने पुढाकार घेऊन खापरखेडा औष्णिक वीज केंद्र प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

हिंदू संस्कृतीचे रक्षण व सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत खापरखेडा औष्णिक वीज केंद्र प्रशासनाने हनुमान मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी १२ लाख रुपयांचा निधी मंजूर केला.शनिवार, दिनांक २७ जून ला मुख्य अभियंता विवेक रोकडे यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात कुदळ मारून मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचे विधिवत भूमिपूजन



करण्यात आले.

याप्रसंगी उपमुख्य अभियंतागण नितीन रोकडे, सचिन देव्हेकर, किशोर सूर्यवंशी, अधिक्षक अभियंता दिनेशदत्त शुक्ला, लेखाधिकारी नंदकिशोर सातकर, अभियंता विवेक पेटकर, सामाजिक कार्यकर्ते अशोक झिंगरे उपस्थित होते. भूमिपूजन सोहळा यशस्वीतेसाठी सुनील पांडे, जयंत झिंगरे, आशिष पौणिकर, हरीश लोडेकर, आशिष फुटाने, किशोर खोरगडे, दिनेश चिखले, अरविंद चिकनकर, बाळकृष्ण पाठराबे, नितीन गोस्वामी, किशोर लाडकर, हेमराज राऊत, सुरेश वानखेडे, मुकेश मित्तल, किशोर तांडेकर, कैलास शिंगने, रोशन बागडे, अशोक वजाळ, राजकुमार उके, नितीन इंगोले, सुरेश बसुले यांच्यासह मोठ्या संख्येने बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धारामुळे रोप-वे कॉलनी परिसरातील या पुरातन हनुमान मंदिराला भव्य स्वरूप प्राप्त होणार असल्याने परिसरात आनंद व्यक्त केल्या जात आहे.

# मोहरम निमित्त आ. किशोर जोरगेवार यांनी घेतले गैबीशाह वली दर्ग्याचे दर्शन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** मोहरमच्या पवित्र पर्वानिमित्त आ. किशोर जोरगेवार यांनी जिल्हा कारागृह परिसरातील हजरत मखदूम उर्फ गैबीशाह वली यांच्या पवित्र दर्ग्याला भेट देत दर्शन घेतले. यावेळी त्यांनी श्रद्धेने समाधीस्थळी चादर अर्पण करून जिल्ह्यात सुख, शांती, बंधुभाव आणि समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री रविंद्र गुरुनुले, सविता दंढारे, अजय जयस्वाल, बलराम डोडाणी, रशिद हुसेन वंदना हातगावकर, नगर सेवक जितेश कुळमेथे, आशिष मासिरकर, नगरसेवक नितेश गवळी, सिनेट सदस्य निलेश बेलखेडे, जन प्रलय



मशाखेत्री, राजकुमार अक्कापल्लीवार, निलिमा वनकर, प्रविण गिलबिले, ईश्वर विरुटकर. भाग्यश्री येरणे, विनोद अनंतवार, दिनकर सोमलकर, हर्षदा गर्गेलवार, आकाश जुनमलवार, मनिषा पडगेलवार हिमांशु पाल आदींची उपस्थिती होती.

मोहरमनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही जिल्हा कारागृहाचे प्रवेशद्वार भाविकांसाठी खुले करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर आ. किशोर जोरगेवार यांनी कारागृहात भेट देऊन येथे असलेल्या गैबीशाह वली यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. कारागृह दरगाह कमिटीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी आ. जोरगेवार यांनी बांधवांना मोहरमच्या शुभेच्छा देत हा सण त्याग, बलिदान, मानवता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा असल्याचे सांगितले. विविध धर्म आणि पंथांमध्ये परस्पर आदर, सलोखा आणि बंधुभाव टिकून राहणे हीच आपल्या समाजाची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

मोहरमच्या निमित्ताने जिल्हा कारागृहातील हजरत मखदूम उर्फ गैबीशाह वली यांचा दर्गा सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला करण्यात आला होता.

त्यामुळे पहाटेपासूनच हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. विविध धर्मीय नागरिकांनी दर्ग्यात दर्शन घेऊन प्रार्थना केली.

# थोडक्यात

## मनसेचे १२ ऑगस्टपासून आझाद मैदानावर आमरण उपोषण : नारकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२७, पाटण :** पाटण तालुका हा दुर्गम, डोंगराळ व आपत्तीग्रस्त असून राज्याला प्रकाशमान करण्यासाठी हजारो मेगावॅट वीज निर्मितीचा खारीचा वाटा उचलतो. मात्र याच तालुक्यातील जनतेला घरगुती वापरासाठी वीज मोफत मिळत नसल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

मनसेचे पाटण तालुकाध्यक्ष गोरख मारुती नारकर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पाटण तालुक्यातील जनतेला घरगुती वापराची वीज मोफत मिळावी या मागणीसाठी दि. १५/०५/२०२६ रोजी पाटण झेंडा चौक ते मुंबई मंत्रालय अशी पदयात्रा काढण्यात आली होती. ही पदयात्रा मुख्यमंत्र्यांना सातारा येथे समक्ष निवेदन दिल्यानंतर शिवतीर्थ नांदे-नवारस्ता येथे स्थगित करण्यात आली होती. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी 'आम्हाला असे सांगितले होते की आम्ही या बाबत आपणांस विचार करून कळवितो,' असे आश्वासन दिले होते.

मात्र आज अखेर कोणताही ठोस निर्णय न झाल्याने दि. १२/०८/२०२६ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा मनसेने दिला आहे. पाटण तालुक्याच्या मातीमध्ये, पाण्यामध्ये समृद्ध महाराष्ट्र घडत असताना तालुक्यातील जनतेच्या त्यागाची कुठेच मोजदाद होताना पहावयास मिळत नाही, अशी खंत नारकर यांनी व्यक्त केली आहे.

तालुक्यातील अनेक ठिकाणी आजरोजी वीज निर्मिती (धरण, पवनचक्की इ. मार्फत) हजारो मेगावॅट केली जाते व भविष्यात हजारो मेगावॅटचे वीज निर्मिती करणारे प्रकल्प उभारण्याची तयारी सुरू आहे. असे असतानाही स्थानिक जनतेला घरगुती वीज मोफत मिळत नाही, ही शोकांतिका असल्याचे निवेदनात म्हणले आहे.

सदर निवेदन राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यासह सर्व संबंधित अधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहे अशी माहिती दिली.

निवेदनासंदर्भात माहिती आयोजित पत्रकार परिषदेत देताना, गोरख नारकर, संजय सत्रे, राहुल संकपाळ, चंद्रकांत बामणे, दयानंद नलवडे, हणमंत पवार, रामचंद्र माने, अधिक पवार, संभाजी चव्हाण, समर्थ चव्हाण मनसैनिकांची यांची उपस्थिती होती.

## श्री सिद्धेश्वर गणेश मंडळाकडून पत्रकार रघुनाथ थोरात यांचा यथोचित सन्मान

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२६, उंब्रज :** द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या कराड तालुका अध्यक्षपदी पत्रकार रघुनाथ थोरात यांची झालेली निवड ही कळंत्रेवाडीसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना व्यक्त करत श्री सिद्धेश्वर गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन पत्रकार रघुनाथ थोरात तसेच त्यांच्या पत्नी स्नेहा थोरात यांचा यथोचित सत्कार केला.यावेळी मंडळाच्या सदस्यांनी रघुनाथ थोरात यांनी ग्रामीण भागातील जनसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने केलेली पत्रकारिता, सामाजिक प्रश्नांवर घेतलेली ठाम भूमिका तसेच गावाच्या विकासासाठी केलेले वृत्तांकन याबद्दल गौरवोद्गार काढले. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे. या माध्यमातून सामान्य नागरिकांच्या समस्या शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य आपण सातत्याने करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना पत्रकार रघुनाथ थोरात यांनी, हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी असून समाजहिताची व निर्भीड पत्रकारिता अधिक जबाबदारीने करण्यासाठी तो निश्चितच बळ देणारा आहे. जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे हेच माझे ध्येय राहील, असे मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी पोलीस पाटील जयसिंग येळवे,श्री सिद्धेश्वर गणेश मंडळाचे अध्यक्ष अविनाश थोरात तसेच मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत उत्साहपूर्ण व आपुलकीचे होते. उपस्थितांनी रघुनाथ थोरात यांना पुढील पत्रकारितेच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याला अधिक यश लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली.

## पाहुणा आलेल्या नातेवाईकाचा घरातील अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न

**अक्षराज : संजय पंडित**




**दि.२७, कळवा (ठाणे) :** कळवा येथील शांतीनगर परिसरात राहणाऱ्या एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा तिच्याच नातेवाईकाने विनयभंग केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. याप्रकरणी कळवा पोलिसांनी ३० वर्षीय आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तो सध्या पसार आहे. पोलिसांकडून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती बुधवारी देण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना २० जून रोजी सकाळी १०:३० ते ११:३० च्या दरम्यान घडली. त्यावेळी पीडित मुलगी कळव्यातील तिच्या राहत्या घरी एकटी होती.

यादरम्यान कांदिवली, मुंबई येथून आलेल्या तिच्या ३० वर्षीय नातेवाईकाने तिला आक्षेपार्ह व्हिडीओ दाखवला. त्यानंतर त्याने पीडितेचा हात धरून तिला अन्य ठिकाणी येण्याबाबत इशारे केले. तसेच तिचा टी-शर्ट काढण्याचा प्रयत्न केल्यावर घाबरलेल्या मुलीने त्याला जोरात झटकले आणि ती तातडीने घराबाहेर पडली.

दरम्यान या प्रकारानंतर पीडित मुलीने घडलेला सर्व प्रकार तिच्या आईला सांगितला. त्यानंतर आईने थेट कळवा पोलिस ठाणे गाठून आरोपी नातेवाईकाविरुद्ध तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी २३ जून रोजी आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान संहिता व पोक्सो कायद्यांतर्गत विनयभंगाचा गुन्हा नोंदवला आहे.